# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 February 2026

Time 18.00 to 18.10

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर नऊ मार्चला सुरू होणार
- मराठी भाषेतली पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची मराठी भाषा मंत्री सामंत यांची घोषणा
- दहशतवाद विरोधी दलाची अहिल्यानंगर, यवतमाळ इथं कारवाई

आणि

- भारत आणि पाकिस्तान दरम्यान विश्वचषक टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेतल्या आजच्या सामन्याची उत्सुकता शिगेला

****

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर नऊ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेतली जाईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनी वृत्तसंस्थेला दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चला सुरु होईल, या टप्प्यात काही विधेयकं चर्चेला येतील, यात एक महत्त्वाचं विधेयक आहे, असं त्यांनी सांगितलं. पहिल्याच दिवशी ९ मार्चला सभापतीं विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर मतदान होईल, असं रिजिजु म्हणाले.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज गुजरातमधे गांधीनगर इथं सीबीडीसी अर्थात केंद्रिय बँक डिजिटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं उद्घाटन केलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयातला भ्रष्टाचार यामुळं

संपुष्टात येईल असा विश्वास यावेळी शाह यांनी व्यक्त केला. तसंच गरीबांना अन्न पोहोचणं सुलभ होईल, असं ते म्हणाले.

****

मराठी भाषेतली पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीत केली. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या सत्कार सोहळ्यात काल ते बोलत होते. परदेशातल्या मराठी नागरिकांच्या पुढच्या पिढीसाठी मराठी शिकवणारा ऑनलाईन अभ्यासक्रम, कवी केशवसुत स्मारकाचं अत्याधुनिकीकरण अशा घोषणाही सामंत यांनी यावेळी केल्या.

****

उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे. या क्रमवारीत तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर असून गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय साधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यं आत्मसात करता यावीत यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ञांची नेमणूक करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२२ मधे मार्गदर्शक तत्वं जारी केली होती. ही नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असेल असंही यात सांगितलं होतं. त्यानुसार देशभरात अशा एक हजार ८४१ नेमणुका झाल्या असून यातल्या तमिळनाडूत ३४५, महाराष्ट्रात १९३, गुजरातमधे १७९ आणि कर्नाटकमधे १७० नेमणुका झाल्या आहेत.

****

दहशतवादाशी संबंधित कारवायांप्रकरणी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली आणि काही संशयितांना ताब्यात घेतलं. यवतमाळमधल्या पुसद आणि उमरखेड इथल्या १४ ठिकाणी शोधमोहिमा सुरू आहेत. त्यात आक्षेपार्ह कागदपत्रं, मोबाईल फोन आणि विद्युत उपकरणं जप्त केल्याची, तसंच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. संशयितांची चौकशी सुरू असून आत्तापर्यंत कोणालाही अटक केलेली नाही. अहिल्यानगर शहरात मुकुंदनगर भागात दहशतवादी कारवायांबद्दलच्या गुप्त माहितीवरून महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकानं चौकशीसाठी अनेक संशयितांना

ताब्यात घेतलं. एटीएसनं पहाटेच्या सुमारास मुकुंदनगरमध्ये कारवाई सुरू केल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

अहमदाबाद इथं गेल्या वर्षी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताबाबत परदेशी माध्यमांनी केलेलं दाव्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी खंडन केलं आहे. अपघाताचा तपास अद्याप सुरू असल्याची माहिती मोहोळ यांनी सांगली इथं बातमीदारांशी बोलताना दिली. या विमान अपघाताची चौकशी करणाऱ्या संस्थेनं अपघातासाठी वैमानिकांना दोषी ठरवल्याचा दावा इटलीतल्या एका दैनिकानं केला होता. मात्र, अद्याप तपाससंस्थांनी तपास पूर्ण करून आपला अहवाल सादर केलेला नसून बाहेरच्या कुठल्याही संस्थांवर विश्वास ठेवू नये, असं मोहोळ म्हणाले. गेल्या वर्षी १२ जून रोजी लंडनच्या दिशेनं जाणारं एअर इंडियाचं विमान अहमदाबाद इथं उड्डाणानंतर लगेच कोसळलं होतं. त्यात विमानातल्या २४१ प्रवाशांसह २६० जणांचा मृत्यू झाला होता.

****

महाशिवरात्रीचा उत्सव आज सर्वत्र भक्तीभावाने साजरा होत आहे. देशातल्या बारा ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणांसह प्रमुख पुरातन शिव मंदीरात पहाटेपासूनच रुद्राभिषेक-महापूजा करण्यात येत असून भाविक मोठ्या संख्येनं दर्शनासाठी गर्दी करत आहेत. राज्यात परळी-वैजनाथ, औंढा-नागनाथ, वेरुळच्या घृष्णेश्वर, तसंच नाशिक जिल्ह्यात त्रंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांच्या स्थानांवर दर्शनासाठी देशोदेशीहून आलेल्या भाविकांची गर्दी झाली आहे. याखेरीज इतर शंकरमंदिरांमधे महाशिवरात्र साजरी होत असल्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत. मुंबईच्या बाबुलनाथ मंदिरात नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी महापूजा केली. ठाण्याच्या कौपिनेश्वर देवालयात, गोंदिया जवळ अडीचशे वर्षांहून जास्त प्राचीन अशा नागराधाम पंचमुखी शिव लिंग मंदिरात, छत्रपती संभाजीनगर शहरातल्या खडकेश्वरच्या महादेव मंदीरातही भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सिडको एन-वन परिसरातल्या नर्मदेश्वर मंदिरात आज संध्याकाळी भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. लातूर शहराचं ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानची महाशिवरात्री निमित्त यात्रा आजपासून सुरु झाली. देशभरात ठिकठिकाणी महादेव मंदिरांमधे शासकीय पूजा आणि अभिषेकही करण्यात येत आहे. चारधामपैकी बाबा केदरनाथ मंदिराचे

दरवाजे येत्या २२ एप्रिलला उघडण्यात येणार असल्याची घोषणा आज महाशिवरात्रीच्या दिवशी करण्यात आली. राज्यात गावोगावी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा भरल्या आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांनी महाशिवरात्री निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. बीड जिल्ह्यात राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज महाशिवरात्रीनिमित्तानं बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी राज्याच्या तसंच देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

****

थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचं आराध्य दैवत, श्री संत सेवालाल महाराज यांची आज जयंती. राज्यभरात यानिमित्त विविध धार्मिक-सांस्कृतीक कार्यक्रम होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महान समाजसुधारक श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केलं. सत्य, अहिंसा आणि उच्च नैतिक मूल्यांचा संदेश प्रसारित करून त्यांनी समाजात नवचेतना निर्माण केली. त्यांचे प्रेरणादायी जीवन देशातील जनतेला सदैव मार्गदर्शन करत राहील, असं मोदी यांनी आपल्या अभिवादन संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई इथं त्यांच्या शासकीय निवासस्थानी सकाळी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. वाशीमच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय-महाविद्यालयाचं नामकरण आता संत सेवालाल महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम असं करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केलं.

****

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारत-पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत कोलंबो इथं रंगणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीतल्या यशापयशावर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

या सामन्यात पावसाचा व्यत्यय येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या साखळी फेरीतल्या सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आलेला नाही. चेन्नई इथं सुरू सामन्यात अमेरिका संघानं नामिबियासमोर २०० धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा नामिबियानं २०व्या षटकात पाच बाद १६३ धावा केल्या आहेत. स्पर्धेत आज मुंबईतल्या वानखेडे मैदानावर झालेल्या गट क च्या सामन्यात वेस्ट इंडीज संघानं नेपाळचा नऊ गडी राखत पराभव केला. वेस्ट इंडीज संघानं १३४ धावांचा पाठलाग करतांना १५ षटक दोन चेंडूत एक गडी गमावत आपलं लक्ष्य गाठलं. त्याआधी फलंदाजीसाठी आलेल्या नेपाळ संघानं निर्धारित २० षटकांत आठ बाद १३३ धावा केल्या होत्या.

****

भारतीय महिला क्रिकेट संघानं सिडने इथं ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या टी–ट्वेंटी सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार २१ धावांनी विजय नोंदवला. ऑस्ट्रेलिया संघाच्या १३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करतांना भारतानं पाच षटक आणि एका चेंडूनंतर एक बाद ५० धावा केल्या होत्या. त्यावेळी पावसाच्या व्यत्ययामुळं खेळ थांबवावा लागला.

****